|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

KAVAYITRI BAHINABAI CHAUDHARI NORTH MAHARSHTRA UNIVERSITY, JALGAON

( पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgao

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4 th Cycle)

स्वातंत्र्याचा अमृत महो

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/३२३ /२०२३ दि. ०२.०२.२०२३

**प्रति,**

१)कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.

२)कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या
शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि शैक्षणिक विभागांचे प्रमुख.

**विषय** :- विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी दि.२ फेब्रुवारी,२०२३ पासून सुरू करण्यात आलेल्या राज्यव्यापी आंदोलनामुळे विद्यापीठाच्या परीक्षा पुढे ढकलण्यात येत असल्याबाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन प्राप्त आदेशान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे व संलग्नीत महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी शासन स्तरावर प्रलंबित असलेल्या विविध मागण्यांसाठी दि. २ फेब्रुवारी,२०२३ पासून अकृषि विद्यापीठे व संलग्नीत महाविद्यालयीन स्तरावर होणाऱ्या सर्व परीक्षांच्या कामकाजावर बहिष्कार टाकून या आंदोलनाची सुरूवात करीत असल्याचे महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन व विद्यापीठ सेवक संयुक्त समिती व संघटनांनी कळविलेले आहे.

तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे विद्यापीठाद्वारा घेण्यात येत असलेल्या परीक्षा आयोजनास अडचणी येत असल्याचे विविध महाविद्यालयांनी देखील कळविलेले आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठाद्वारा दि.३ फेब्रुवारी,२०२३ पासून पुढे घेण्यात येणाऱ्या सर्व परीक्षा पुढील आदेश होईपर्यंत पुढे ढकलण्यात येत असून, याची सर्व संबंधित विद्यार्थी, पालक, प्राचार्य, शिक्षक यांनी नोंद घ्यावी.

पुढे ढकलण्यात आलेल्या परीक्षा आयोजनाबाबत यथावकाश कळविण्यात येईल.

आदेशान्वये,

(प्रा.दिपक श.दलाल)
प्र. संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीसाठी अग्रेषित.**

१.मा. कुलगुरु महोदयांचे कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
२.मा. प्र-कुलगुरू, कबचौउमवि, जळगाव
३.मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
४.सर्व विद्याशाखांचे मा.अधिष्ठाता/प्र.अधिष्ठाता, प्र.सहयोगी अधिष्ठाता

**प्रत-माहिती व कार्यवाहीसाठी :**

१) उपकुलसचिव,(अ.का.)परीक्षा व मूल्यमापन मंडळ, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
२) संगणक केंद्र प्रमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
३) यंत्रणा विश्लेषक,संगणक केंद्र,परीक्षा व मूल्यमापन मंडळ, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
४) प्र.सहायक कुलसचिव,(गोपनीय पूर्वार्ध),क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
५) समन्वयक, एम.के.सी.एल., ,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
६) परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या सर्व उपविभागांचे प्रमुख/नियंत्रक अधिकारी
७) जनसंपर्क अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव :- कृपया, परीक्षा पुढे ढकलण्यात येत असल्याची बाब बातमीरुपाने सर्व वृत्तपत्रात प्रसिध्दीस देण्याची कार्यवाही व्हावी ही विनंती.